☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 349 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 08 / 09 / 2025

# 1)गंभीर दुखापत :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 07.09.2025 रोजी 07.30 ते 07.40 वा. चे दरम्यान, **जयभिमनगर नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.प्रकाश उत्तम खाडे, वय 34 वर्षे, 2.अशोक उत्तम खाडे, वय 35 वर्षे, दोघे रा. जियभिमनगर नांदेड यांनी संगनमत करून फिर्यादीस दारू पिण्यासाठी पैसे मागीतले असता फिर्यादीने पैसे न दिल्यामुळे आरोपीतांनी चिडुन डोक्यात लाकडी बल्याने मारून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी सौ नंदा भ्र. बालाजी गायकवाड, वय 45 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. जयभिमनगर नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 338 / 2025 कलम 118(2),115(2),352,3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि / श्री गावंडे, मो.नं. 9028941030** हे करीत आहेत.

**2)मुखेड :–** दिनांक 03.09.2025 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **जुना तलाव सांडपाण्याच्या पुलावर मुखेड ते जुना जाणारे रोडवर ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.दामोदर गोविंद जाहिरे, वय 50 वर्षे, 2.बालाजी दामोदर जाहिरे, वय 25 वर्षे, 3.खंडु दामोदर जाहिरे, वय 22 वर्षे, 4.दत्ता रवी जाहिरे, वय 21 वर्षे, सर्व रा. जुना ता. मुखेड यांनी संगणमत करून फिर्यादी हा मुखेडकडुन जुन्याकडे जात असतांना फिर्यादीस रोडवर उभा करून आरोपीतांनी पकडुन खाली पाडुन जुने भांडणाचे कारणावरून मनात राग धरून डावे मांडीवर व डावे दंडावर जबर मारून गंभीर दुखापत केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी श्री शिवशाम सुदाम जाहिरे, वय 37 वर्षे, व्यवसाय खाजगी ड्रायव्हर, रा. जुना ता. मुखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 210 / 2025 कलम 118(2),118(1),115(2),352,351(1), 3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोहेकॉ / **1001 जाधव, मो.नं. 7030066459** हे करीत आहेत.

# 2)अपघात :–

**मनाठा :–** दिनांक 06.09.2025 रोजी 17.00 वा. चे सुमारास, वरवट ते मनाठा **रोडवर शेख फरीद बाबा दर्गा समोर सार्वजनिक रोडवर ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे कांताबाई भ्र कचरू वाठोरे, वय 40 वर्षे, रा. मनाठा ता. हदगांव** हया आरोपी नामे प्रकाश विठ्ठल वाठोरे, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. मनाठा ता. हदगांव यांचे शेतात मजुरीचे कामासाठी गेले असता काम संपवुन सायंकाळी घरी परत येत असतांना यातील नमुद आरोपी हा मयत बाईस मोटार सायकलवर बसवुन मनाठा गावाकडे येत असतांना आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्रमांक एमएच–26 / एजी–5077 ही हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन रोडवरील खडयात मोटार सायकल आदळयाने मयत बाई ही मोटार सायकलवरून खाली पडुन डोक्यास गंभीर मार लागुन मरण पावली. यातील नमुद आरोपी हा मयताचे मरणास कारणीभुत झाला. तसेच यातील जखमी महीलेस उपचारासाठी दवाखान्यात न नेता आरोपी हा परस्पर निघुन गेला. वगैरे **फिर्यादी सौ. गुंजन भ्र. संघशिल नरवाडे, वय 19 वर्षे, व्यवसाय गृहीणी रा. वाटेगाव ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं. 177 / 2025 कलम 106(1), 281 बीएनएस–2023 कायदा सह कलम 134 / 187 मोवाका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री सुदर्शन इंगोले , मो.नं. 9764905142** हे करीत आहेत.

# 3)प्रोव्हिबिशन :–

**1)हदगांव :–** दिनांक 07.09.2025 रोजी सकाळी 11.00 वा. चे सुमारास, **तामसा रोडवर सुभाष शुगर काखान्यासमोर रेणुका धाबा हदगांव ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे संजय निवृती तीवाळे, वय 56 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. डोंगरगाव ता. हदगांव हा विना परवाना बेकायदेशिररीत्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमत 1920 /–रू चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ / 991 संदीप मारोतराव घोगरे, ने. स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे हदगांव** गुरनं 306 / 2025 कलम 65(ई) म.प्रो.का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2817 मुंडिक,** मो.नं. 7774032817 हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 07.09.2025 रोजी चे 09.00 वा. चे सुमारास, **वाडीपाटी येथील बेस्ट चिकन सेंटरच्या दक्षिणेस असलेल्या मोकळया जागेत ता. जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे जयपाल दिनकर कोलते, वय 46 वर्षे, व्यवसाय बेकार रा. बुरूड गल्ली होळी इतवारा ह. मु. सुनिलनगर बळीरामपुर ता.जि. नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररीत्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमत 1760/–रू चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1429 मारोती खुशालराव भांगे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 868/2025 कलम 65(ई) म.प्रो.का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/581 मांजरमकर,** मो.नं. 9850600069 हे करीत आहेत.

## 4)विषारी औषध पिवून आत्महत्या :–

**भोकर :–**दिनांक 07.09.2025 रोजी सकाळी 09.00 वा. चे सुमारास, **मौ. कांडली ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे साईनाथ रामल्लु गंदमवाड, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. कांडली ता. भोकर जि. नांदेड** यांनी शेतीच्या सततच्या नापिकीला व बॅकेच्या कर्जाला कंटाळुन कोणतेतरी विषारी औषध पिवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार रजलराम चिंनन्ना गंदमवाड, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. कांडली ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून **पोस्टे भोकर आ. मृ. 45/2025** कलम 194 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे दाखल असुन **तपास पोहेकॉ/992 श्री राचलवार, मो.नं. 8888498777** हे करीत आहेत.

## 5)पाण्यात बुडून मृत्यु :–

**देगलुर :–**दिनांक 05.09.2025 रोजी 19.00 वा. चे सुमारास, **गंगानदी पात्रामध्ये देगलुर शिवार ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे माधव पुंडलीक हानुमाने, वय 25 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. देगांव ता. देगलुर जि. नांदेड** हा श्री साई गणेश मंडळाचा गणपती गंगा नदी पात्रामध्ये विसर्जन करून हात पाय धुत असतांना पाय घसरून नदीच्या पात्रात पडून पाण्यात बुडून मरण पावला. वगैरे **खबर देणार पुंडलीक बाबु हानुमाने, वय 45 वर्षे व्यवसाय मजुरी रा. देगाव ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून **पोस्टे देगलुर आ. मृ. 29/2025** कलम 194 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे दाखल असुन **तपास मपोहेकॉ/1206 शेख रहेनाबानू, मो.नं. 9552516287** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड